॥ श्री गुरुः शरणम् ॥

# सिद्ध महायोग माहात्म्य

अर्थात

## शक्ती जागृतीची आवश्यकता



प. पू. सद्‌गुरु सिध्दयोगेश्वर महाराज

॥ श्री गुरुः शरणं ॥

मानवी जीवन हे आधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिक अशा नाना-तऱ्हेच्या दुःखानी भरलेले आहे. विश्वातील प्रत्येक प्राणिमात्रास एकच एक इच्छा असते की, आपल्याला कधीही दुःख न होता सतत सुखाची प्राप्ती व्हावी. जीवनातील त्याच्या सर्व प्रयत्नामागे हेच उद्दिष्ट असते. अशा प्रयत्नामागे धावताना मानवाला कधीकधी यश आल्याप्रमाणे वाटते. पण पुष्कळ वेळा असे प्रयत्न; उद्योग विफलच होत असतात. व त्यामुळे मानवी जीवनातील दुःख दिवस प्रति दिवस वाढतच असते. म्हणूनच या विश्वातील यश्चयावत् प्राणिमात्र दुःखापासून सुटका व कधीही न संपणारे सुख कशामुळे प्राप्त होईल याचा सतत शोध घेत असतात. परन्तु प्रत्येकास हवे असलेले सुख प्राप्त न होता, नको असलेले दुःख मात्र प्राप्त होते. याचाच अर्थ असा की, जीवाचे सुखप्राप्तीचे प्रयत्न चुकत असावेत किंवा त्याच्या सुखाच्या अपेक्षेत हीनत्व असण्याचा संभव असतो. आपण ज्या सुखाची अपेक्षा करतो ते सुखच नव्हे, कारण दुःखच सुखाचा पोशाख घालून छळत असते. या भौतिक सुखाची तऱ्हाच अशी आहे. येथील सुर्यादिकांचा उदयच मुळी अस्तासाठी होतो. गर्भ पोटात असतानाच मृत्यु त्याला शोधत येतो. सध्याच्या प्रगत वैज्ञानिक युगातही आपल्याला हेच अनुभवास येते. अशा तऱ्हेने सुखाची अपेक्षा करताना दुःखच हाती येते. प्रत्येकाची धाव ही चिरंतन, निःश्रेयस सुखासाठी असते. पाण्यात दिसणारे चंद्रबिंब मासे पकडण्याच्या जाळयाने पकडण्याचा प्रयत्न करणे जेवढे चुकीचे आहे, तेवढेच आपले सुखप्राप्तीचे प्रयत्न चुकीचे असतात. मग कोणत्या मार्गाने गेले असता आपल्याला आनंद व शांती प्राप्त होईल? शाश्वत सुखाची प्राप्ती होईल ?

आपली सर्व शास्त्रे आपल्याला आवर्जून सांगत आहेत की; परमेश्वराच्या प्राप्तीनेच जीवाच्या आधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिक या तिन्ही तपांची शांति होऊन त्याला अक्षय्य, निःश्रेयस, व निरालंब असे सुख प्राप्त होईल. अकस्मिक देहपात, मृत्यु, अपघात हे अविरतपणे प्रत्येकाच्या आयुष्यात होत असल्याने हे विश्व त्या सच्चिदानंदघन परमेश्वराहून भिन्न असल्याची जाणिव प्रत्येक मानवाला सतत होत असते. या जगातील भौतिक विषयापासून प्राप्त होणारी सुखे ही परावलंबी असतात. अपूर्ण असतात. म्हणून आपणच जर विवेकपूर्वक, त्या सर्वव्यापी सत्स्वरूप, विविध तऱ्हेने दुःखानी भरलेल्या या संसार सागरातून आपल्या लिलेने पार नेणाऱ्या त्या परमेश्वराची कृपा संपादण्यात संपूर्ण यश मिळविले तरच आपल्याला अक्षय्य सुखाची प्राप्ती होईल. याकरिता आपले सर्व प्रयत्न त्या एका परमेश्वर प्राप्तीसाठीच असले

पाहिजेत. कारण तेच एकमेव अक्षय्य सुखाचे भांडार आहे. आणि आपण त्या परमेश्वरासच विसरलो तर आपली हानि आपणच केल्याचा अक्षम्य अपराध घडेल. मानवी जीवांच्या जीवनाची अंतीम सार्थकता परमेश्वर प्राप्ती हीच आहे. कारण त्याला प्राप्त करून घेतल्यावर कोणत्याही गोष्टीची न्यूनता न राहता सर्व गोष्टी प्राप्त होतात. दुःखातील दुःखसुद्धा त्याला विचलित करू शकत नाही. ज्ञानी ऋषिमुनींनी परमेश्वराचे वर्णन करताना; तो महान आहे, शांतिब्रह्म आहे, अमृतमय आहे असे म्हटले आहे. परमेश्वर महान तर आहेच पण त्याला जाणणारा प्रत्येक जीवच महान होऊन जातो. तो फक्त शांतिब्रह्मच आहे असे नाही; तर जो जीव त्याला प्राप्त करून घेतो तो जीवच परमशांतीचा लाभ घेतो. तो फक्त अमृतमय आहे असे नाही, तर जो त्याला प्राप्त करून घेतो; त्या जीवाची मरणाच्या भयातून मुक्तता होऊन तो जीवच अमृतमय होतो. परमेश्वर प्र.प्तीने दुःख नष्ट होऊन परमशांतिचा लाभ होतो. त्याला प्राप्त करून घेणारा जीव महान होतो अमृतमय होतो, मुक्त होतो. हे खरे ! पण त्याला प्राप्त करून घेण्याचा मार्ग कोणता? कोणत्या मार्गाने गेले असता परमेश्वराची प्राप्ती होईल? आणि असा तो मार्ग सर्वसामान्य जनांना सुलभ असला पाहिजे.

जगातील प्रत्येक प्राणी हा सच्चिदानंद-घन परमेश्वराचा अंशच आहे. आणि त्याच प्रमाणे नित्य सत्ता नित्य चैतन्य आणि नित्य आनंद हे त्याचे स्वतःचे स्वरूप आहे. परन्तु अनादी कालापासून अविद्या मायेमध्ये सांपडून, तो स्वतःच स्वतःला विसरला आहे. तो नित्य मुक्त असूनही बद्ध अवस्थेचे भोग भोगतो आहे. तो स्वतः अमृत स्वरूप असूनही मृत्यूला घाबरत आहे. आणि स्वतः सुखाचा सागर असून या भौतिक विश्वातील परावलंबी, अपूर्ण, आणि क्षणैक सुखासाठी धडपडत आहे. यासाठी मनुष्याला ज्ञानप्राप्ती होऊन तो ब्रह्मस्वरूप व्हावा म्हणून शास्त्रकारांनी कर्मयोग, ज्ञानयोग, मंत्रयोग, भक्तियोग, अष्टांगयोग जपतप असे निरनिराळे मार्ग सांगितले आहेत. ते सर्व ज्या मूळ अज्ञानामुळे जीव सुखदुःखाच्या भोवऱ्यात सापडला आहे; ते अज्ञान नाहीसे होऊन, त्याला ज्ञान प्राप्ती व्हावी, व तो ब्रह्मस्वरूप व्हावा म्हणून !

कर्मयोगामध्ये सांगितले जाते की, कर्मफलाची आशा न करीता कर्माचे आचरण केले पाहिजे, व असे कर्माचरण करताना जे कांही सुखदुःख होईल ते सोसले पाहीजे प्रत्येक मनुष्य क्षणाक्षणाला देहाने किंवा मनाने कोणते ना कोणते कर्म करीतच असतो; आणि त्यामुळे कर्माचे बंधन त्याला लागत असते. जोपर्यन्त प्रकृतीचा (प्रकृती कार्य व देहैंद्रियांचा) संबंध आश्रय आहे तोपर्यन्त मी कर्मानुष्ठान करीन, कर्माचा त्याग करीन असे म्हणणे अज्ञानपूर्वक आहे. कारण जेवढे म्हणून कर्म घडते, ते गुणाधीन आहे. त्यापासून सुखदुःख हे प्राप्त होणारच मग अशावेळी वेदविहीत कर्म हट्टाने, द्वेषाने टाकले म्हणून कर्म करण्याचे देहैंद्रियांचे स्वाभाविक धर्म नष्ट

होणार नाहीत विहीत कर्म हट्टाने टाकले म्हणून कानानी ऐकण्याचे बंद होणार नाही. डोळ्यातील पाहण्याचे सामर्थ्य जाणार नाही. नाकाने वास घेणे किंवा प्राणापानवायूंच्या गतीही थांबणार नाहीत. मनाचे संकल्प विकल्पही नष्ट होणार नाहीत किंवा प्राणधर्म तहानभूकेची इच्छा थांबणार नाही. जन्ममरणही चुकणार नाही. हे जर कोणतेही व्यापार बंद पडत नाहीत; तर मग सोडणार काय ? म्हणजे देहाभिमान्याकडून कर्म त्याग होणे कठीण आहे. कर्म हे पराधीनतेमुळे प्रकृतीच्या गुणामुळें होते. जसे वाहनारूढ मनुष्य स्वस्थ बसला तरी वाहनाचे हिंडणे फिरण्याने ह्यांचे ही सहजच हिंडणे फिरणे घडते. तद्वत जीवाला (देहाभिमान्याला) कर्मरहीत होणे संभवत नाही. पतिव्रता आपल्या पतीचीं सेवा निष्काम बुद्धीने करते तसे प्राप्त कर्म निर्हेतुक चित्ताने आचरणे आवश्यक आहे. असेच कर्म, कर्मबंधापासून सोडविणारे बनते. जोपर्यन्त कर्म आणि बंधन ह्यांचे विषचक्र थांबत नाही, तोपर्यन्त जन्ममरणाचे विषचक्र देखील थांबणार नाही. म्हणजे कर्मक्षयाविना मोक्षप्राप्ती अशक्यच आहे. कर्मफलाच्या त्यागाची गोष्ट बोलणे जेवढे सोपे आहे; तेवढे ते कृतीत आणणे सोपे नाही. जो कोणी आत्मज्ञानी असेल त्यालाच कर्मत्याग शक्य आहे. कारण ज्ञान्याची सर्व कर्मे त्याच्याशीच ऐक्य पावत असतात. कमळ पाण्याच्या संगतीत असूनही पाण्यापासून अलिप्त असते, अशी अलिप्तता आत्मज्ञान्यावाचून कोणास जमणार ? मग इतर सर्वसामान्य संसारी जीवांची काय कथा?

आता भक्तियोगाचे पहाल तर, आपल्या हिताकरिता प्रत्येक जण परमेश्वरांची भक्ती करीतच असतो पण हा खऱ्या भक्तीचा उद्रेक नव्हे. खरी भक्ती तीच की. जी परमेश्वराकडून कांहीही अपेक्षा न ठेवता, त्याच्या प्राप्तीसाठी असते. जसे दुधाच्या आशेने सर्वजण गाईला चारा घालतात. पण गाय मात्र चाऱ्यावाचूनही वत्साला केंव्हाही दूध पाजते. कारण वासरू गाईचे अनन्य भक्त असते. एवढी भक्ती असल्यावर प्रभुकृपेस काय अडचण ? परन्तु एवढी भक्ती आंतून प्रकट होणे, म्हणजे श्रेष्ठ भक्तीचा उदय होणे, ही गोष्ट एका सद्गुरूकृपेवाचून म्हणजेच सद्गुरूंनीच कृपावंत होऊन स्वतःच शिष्याच्या मनात भक्तीचा अंतर्भाव केल्याविना होणार नाही. आणि असा श्रेष्ठभक्तीचा उदय शक्तिपाताविना म्हणजेच जगन्माता कुंडलिनीदेवीच्या जागृतिविना अशक्यच आहे. अशी ही भक्ती सद्गुरूकृपेने सहजच प्राप्त होते. एरवी अशी भक्ती मिळणे कठीणच ! जसे शूराच्या फौजेतून तलवारीचे घाव झेलून एखादाच विजयश्रीच्या सिंहासनावर विराजमान होतो, तसे हे कठीण आहे. कारण विषयाच्या दाट झाडीतून, कामक्रोधादिकांची संकटे टाळून साधूंच्या संगतीने, सत्कर्माच्या सरळ वाटेने फलाशेच्या वहाणा न घालता, अज्ञानाच्या रात्रीत

एकटाच वाट चालतो. त्यावेळी गुरूकृपेचा उषःकाल होऊन त्यांचेच कृपेने ज्ञानसूर्य दृष्टीस पडून परमेश्वराचे ऐश्वर्य सापडते. ते ज्ञान म्हणजेच प्रत्यक्षानुभूति.

ज्ञानयोगाचा विचार करता भारतवर्षातील सर्व संप्रदायांचा हेतू माणसांला ज्ञानप्राप्त करून देणे हाच आहे. कारण ज्ञानाविना मोक्ष प्राप्त होऊ शकत नाही. या ज्ञानप्राप्तीमुळे मनुष्याला सर्व सुखात उत्तम मानले जाणारे असे अध्यात्म सौख्य प्राप्त होते. अध्यात्म सुख हे सर्वश्रेष्ठ आहे, निःश्रेयस आहे. येथे ज्ञान म्हणजे पुस्तकाने वा प्रवचनाने मिळणारे ज्ञान नव्हे. तर ज्ञान म्हणजे आत्म्याविषयीचे ज्ञान, परमेश्वराविषयीचे ज्ञान. जीव हा मूलतःच ब्रह्मस्वरूप आहे! तो आनंदस्वरूप आहे! आत्मा आणि देह निराळे आहेत. आत्मा हाच परमेश्वर आहे! तो या दृश्य जगातील चर्मचक्षूने पाहण्यासारखी वस्तु नाही. इत्यादी जे ज्ञानमार्गात सांगितले जाते. ते आत्म्याविषयीचे अक्षरज्ञान झाले. वैचारीकज्ञान झाले. ते सत्यज्ञान नव्हे. जो साधक फक्त वैचारीक ज्ञान साधना करतो, तो विचारांच्या चक्रात फिरत राहतो केवळ वैचारिक ज्ञानसाधना मोक्षदायी होऊच शकत नाही. नुसती वैचारीक ज्ञानसाधना करणारा साधक अनेक जन्म पुष्कळ कालपर्यंत ज्ञानाचा विचार करून मी मुक्त आहे, असे नुसते विचारानेच मानत असतो पण मी मुक्त आहे असे मानल्याने ज्ञानसाधक मुक्त कसा होईल? शास्त्रकारांनी अत्यंत आवर्जून सांगितले आहे, कीं, मी मुक्त आहे, असे चिंतन करा ते याकरीता की, मन आणि बुद्धी मलरहीत होऊन शुद्ध होण्यासाठी मात्र अशा चिंतनाने साधकास मी मुक्त आहे, मी ब्रह्म आहे, याची प्रत्यक्षानुभूति येणे कधीही शक्य नाही. अशा तऱ्हेच्या वैचारिक ज्ञान्याची स्थिती सांगताना भगवान श्री. शंकर म्हणतात –

"अज्ञानं कीदृशं चेति प्रविचार्यं विवेकिना ॥
ज्ञातं येन निजंरूपं कैवल्यं परमं शिवम् ॥२२॥
असौ दोषैर्विमुक्तः किं कामक्रोध भयादिभिः ॥
सर्व दोषैर्वृतो जीवः कथं ज्ञानेन मुच्यते ॥२३॥ (योगबीज श्लोक २२-२३)

(अर्थ– "अज्ञान हे कशा प्रकारचे आहे. याचा विवेकी पुरुषाने गंभीरपणे विचार केला पाहिजे. केवळ विचाराने स्वतःच्या अत्यंत श्रेष्ठ अशा कैवल्यरुपाला मी जाणले आहे; असे ज म्हणतात ते काम क्रोध, भय इत्यादी दोषांपासून थोडेच मुक्त झालेले असतात? अशा प्रकारे केवळ विचाराने ज्यना ज्ञान झालेले असते; ते लोक मुक्त होणे शक्य नाही. अशा प्रकारे दोषांनी आवृत्त असलेला जीव केवळ वैचारिक ज्ञानाने मुक्त होणे कसे शक्य आहे?) ही वैचारिक ज्ञान असलेल्या साधकाची स्थिती आहे. आणि जो परमेश्वरी ज्ञानाची प्रत्यक्षानुभूति घेतलेला आहे त्यांची स्थिती सांगताना त्याच्या स्वरूपस्थिती व गुणाबद्दल भगवंतानी गीतेच्या १३ व्या अध्यायात वर्णन केले आहे.

"अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् ॥
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥" (अ. १३ श्लो. ७)

अमानित्व, दंभरहितता, अहिंसा, सर्वसहनशीलता, सद्गुरुसेवा, अंतर्बाह्य शुद्धी, स्थैर्य, अंतःकरणनिग्रह अशा प्रकारची ज्ञान्याची उत्तमोत्तम लक्षणे सांगितलेली आहेत. ती ज्ञान्याच्या आचरणाची लक्षणे सांगितलेली आहेत. तेंव्हा ज्ञान ही बुद्धीची मिरासदारी आहे; असे समजण्याची कोणीही चूक करू नये. पिण्डाची संहारणी होऊन दिव्य चक्षूंचे उन्मीलन झाल्याशिवाय आत्म्याविषयीचे, ईश्वराविषयीचे सत्यज्ञान होणे कधीही शक्य नाही. याचा अर्थ असा की, परमेश्वरी सत्यज्ञान हे तर्कबुद्धी वगैरेच्या पलीकडील असून ती एक अत्यंत श्रेष्ठ अशी अनुभूति आहे. ही अनुभूति केवळ शब्दच्छल किंवा तर्काने मिळणे शक्यच नाही. ज्या आत्मज्ञान्याला ही प्रत्यक्ष अनुभूति आहे, तोच ही अनुभूति दुसऱ्याला देऊ शकेल. अशा या ज्ञानाच्या प्रत्यक्षानुभूतीसाठी सद्गुरूंची त्यांच्या कृपेने अज्ञानाचा नाश होण्याची अतिशय आवश्यकता असते.

हठयोग मंत्रयोग वगैरे सारखे मार्ग शास्त्रांमध्ये लिहिले आहेत. या प्रत्येक मार्गामध्ये अतिशय कठोर कष्ट सहन करावे लागतातच परंतु दिर्घ कालानंतर सुद्धा ही शास्त्रे साधकाला एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच आणून सोडतात. शिवाय मंत्रातील चुका या यजमानाच्या मस्तकावर वज्राक्षता होऊन पडतात. यामधील हे धोके, हा दिर्घ काल, असे खडतर कष्ट सोसून ही, वाट चुकल्याप्रमाणे शेवटी कोठेतरी, सदगुरूंच्या कृपेने शक्तिच्या जागृतीची वाट पहात बसण्याची पाळी येते. मग पुढे पूर्णत्वा-पर्यंत जाण्यासाठी सदगुरूंची म्हणजेच त्यांच्या कृपेने अज्ञानाचा नाश होण्याची म्हणजेच शक्तिपात होण्याची अत्यावशकता असते.

इतक्या सगळ्या मार्गाचा विचार केला तर एक गोष्ट लक्षात येते की कितीही कठोर परिश्रम केले तरी ज्यावेळी सदगुरुकृपेने शक्तिपात होऊन कुंडलिनीची जागृती होते त्याचवेळी दिव्यचक्षुचेउन्मीलन होऊन मनुष्य परमेश्वरापर्यंत पोहोचतो

जो पर्यंत शिव आणि शक्तिचे मीलन होत नाही तो पर्यंत परमेश्वराचा साक्षात्कार होणे शक्य नाही. सहस्त्रार चक्रामधे स्थित असलेल्या शिवाला; जेव्हां मूलाधार चक्रामध्ये निद्रिस्त असलेली कुंडलिनी शक्ती जागृत होऊन सुषुम्नेच्या वाटेने भेटेल; त्याच-वेळी परमेश्वराचा साक्षात्कार होईल, म्हणजेच शिव आणि शक्तिचे मीलन होण्यासाठी कुंडलिनी शक्तिची जागृती व्हावी लागते. आणि त्या जागृतीसाठीच हे सर्व योग आणि खट्टाटोप! आणि ज्यावेळी आत्मशक्ती कुंडलिनी जागृत होईल, त्याचवेळी

खरी साधना सुरू होईल. तद्नंतर साक्षात्कार! ह्या सर्व दीर्घ प्रवासात देहाची शाश्वती कोठपर्यंत देता येणार? त्यामुळे एखाद्या सर्वश्रेष्ठ अशा सिद्धपुरुषाच्याच कृपेने आत्मशक्ती कुंडलिनी जागृत होणे, हे अत्यावश्यक आहे. आणि ज्यावेळी, अशा तऱ्हेने कुंडलिनी जागृत होऊन साधना सुरू होते, तेव्हा ही सद्गुरू कृपेने जागृत-झालेली जगन्माता साधकाची मातेप्रमाणे काळजी घेऊन, त्याला श्रेष्ठ पदाला पोहचविल्याशिवाय राहात नाही.

. इतर सर्व शास्त्रांचा विचार तथा अवलंब केल्यावर शेवटी एकच निष्कर्ष निघतो की, आत्मशक्ती कुंडलिनीच्या जागृतीनेच मनुष्याला संपूर्ण ज्ञान व संपूर्ण चैतन्य यांची प्राप्ती होईल. स्वामी विवेकानंद राजयोगाच्या चवथ्या प्रकरणात म्हणतात". "संपूर्ण ज्ञान आणि संपूर्ण चैतन्य याची प्राप्ती करून घेण्याकरिता कुंडलिनी जागृत करणे हा एकच उपाय आपणास उपलब्ध आहे." वरील सर्व शास्त्रे ही शेवटी कुंडलिनी जागृतीची आवश्यकता येथपर्यन्त आणून सोडतात. मग ही जगन्माता साधकाला दिव्य अनुभव देऊन ब्रह्मप्राप्ती करविते. कुंडलिनीची जागृती व तिची कृपा यांच्या आवश्यकतेबद्दल अनेक ठिकाणी वर्णने आली आहेत. श्री. ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात म्हणतात,–.

तें कुंडलिनी जगदंबा। जे चैतन्य चक्रवर्तिची शोभा॥
जया विश्वबिजाचिया कोंभा। साऊली केली॥

आधार शक्ति निद्रायां विश्वम् भवति निद्रया॥
तस्यां शक्तिप्रबोधेन त्र्यैलोक्यं प्रतिबुध्यते॥

सदाकारा परानंदा संसारोच्छदे कारिणी॥
सा शिवा परमादेवी शिवाभिन्ना शिवंकरी॥

समर्थ रामदास म्हणतात – (आत्माराम मायानिरूपण)

माया भवसिंधूचे तरू माया पाववी पैलपारू॥
मायेविण उद्धारू। प्राणियांस नाही॥

यावरून कुंडलिनी शक्तिजागृतीचे महत्व लक्षात येते. जोपर्यन्त भगवत्शक्ती जागृत होत नाही, तोपर्यन्त जीवनाचे खरे सार्थक होत नाही, व संघर्षही संपत नाहीत. इतर शेकडोशे साधने, यज्ञयागादी अनुष्ठाने, यांचा ब्रह्मप्राप्तीसाठी काडीमात्रही उपयोग होत नाही कारण कामना पूर्तीच्या ध्येयामुळे अंतःकरण अंधःकारमय राहते. शास्त्रीय ज्ञान पांडित्य, जपतपादी गोष्टी बहिर्मुख आहेत तोवर त्या व्यर्थ ठरतात या सर्व गोष्टींचा उदय आतून व्हायला हवा हे केवळ कुंडलिनी जागृतीनेच होऊ शकते कारण या सर्व गोष्टी कुंडलिनी स्वतःच करवून घेऊन साधकाला ब्रह्मप्राप्ती घडविते.

या दृष्टीने वरील सर्व प्रकारच्या योगाचे फल ज्या प्रकारच्या साधनेने लाभेल, त्याच मार्गाचा अवलंब करणे हे फारच सुगम ठरेल व ते आवश्यक आहे. तर असा असलेला एकच सर्वश्रेष्ठ असा योग म्हणजे महायोग होय. भूतलावर या योगापेक्षा दुसरा श्रेष्ठ योग नाही. (महायोगाचे महत्व आणि श्रेष्ठता विषद करणारे विवेचन वारकरी पंथाचे संतश्रेष्ठ श्री. मामासाहेब दांडेकर यांनी आपल्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेतील ९ व्या प्रकरणात अधिक स्पष्टतेने लिहीले आहे. अधिक माहीती हवी असल्यास कृपया तें वाचावें) या एकाच महायोगात इतर सर्व योगांचा व उपासनांचा समावेश झालाआहे. शक्तिवात योगालाच महायोग म्हणतात यालाच सहजयोग, शांभवी दीक्षा वगैरे नांवे आहेत सर्व जपतप क्रिया कर्म यांचा अंतर्भाव या महायोगात आहे. किंबहुना मंत्रयोग, हठयोग, राजयोग लययोग हे चार ही भिन्न नसून कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यावर हे चारही योग साधकाला स्वतः होतात यालाच महायोग म्हणतात. हे सांगताना योग शिखोपनिषदात म्हटले आहे–

"मंत्रो लयो हठो राजयोगोऽन्तर्भूमिका क्रमान् ।
एक एव चतुर्धाऽयं महायोगोऽभिधीयते ॥ १२९ ॥"

ज्यावेळी साधकाला एखाद्या अत्यंत शक्तिमान गुरूंकडून अनुग्रह प्राप्त होतो त्यावेळी त्याचे पूर्वपुण्य उदयास येऊन कुंडलिनी शक्ती जागृत होऊन कल्पनातीत अनुभव येऊ लागतात. त्यामुळे साधक आनंदोल्हासा प्रफुल्ल होऊन जातो. व ती उर्ध्वगामी शक्ती हृदयाकाश निर्मल व स्वच्छ करून ज्ञानाच्या प्रकाशाने परिपूर्ण करते. व साधकाला शिवाच्या निष्फलरूपांच्या सायुज्यतेचे आलिंगन घडवून शिवस्वरूप बनविते. सर्व तऱ्हेच्या जपतपादी कर्मादिचा अंतर्भाव असलेला असा एकमेव राजमार्ग आहे. तो हा महायोग. परन्तु याची प्राप्ती होणे अत्यावश्यक आहे. अशा या आत्मशक्ती कुंडलिनीची जागृती अतिशय श्रेष्ठ दर्जाचे सिद्ध गुरूच करू शकतात. सद्गुरूंची कृपा होण्यास म्हणजे शक्तिपाताने शक्ती जागृती होण्यास योग्य अयोग्य असा भेद केला जात नाही. कारण प्रत्येक जीवमात्राला परमेश्वराकडे जाण्याचा अधिकारच आहे. मनुष्यमात्र हा ज्ञानाचा अधिकारी आहे. कर्म, जाति, अवस्था यांचा तपश्चर्येत भेद नाही. प्रत्येक अस्तिक मनुष्यप्राणी मग पुरूष वा स्त्री, बाल वा वृद्ध, पुण्यवान वा पापी कसाही असो, सद्गुरु कृपेने त्याच्यातील कुंडलिनी शक्ती जागृत होते व त्याच्या तत्काळ अनुभूतिंना सुरूवात होते. नंतर आपापल्या संस्काराप्रमाणे सि-दी होते. याप्रमाणे जागृत झालेली कुंडलीनी शक्ती भिन्न प्रकृतीच्या लोकांकडून वेगवेगळ्या प्रकाराने मन प्राण व शरीराला अनुकूल असे योगशास्त्रोक्त साधन शिवशक्ती संमेलनार्थ समाधिसाठी नाना प्रकारच्या क्रियेद्वारा करवून घेते, यावेळी महामाया कुंडलिनी क्रिया करविते या प्रत्यक्षाला प्रमाणाची आवश्यकता नाही. महायोगाचे महात्म्य उच्च आहे.

वरील सर्व आसन प्राणायामादी निरनिराळ्या क्रिया आपण न करताच ज्याप्रमाणे नाव प्रवाहात सहजगत्या वहात जाते; त्याप्रमाणे स्वतः सिद्ध होऊ लागतात. अष्टसात्विक भाव उफाळून येणे, शरीरात कंप होणे इच्छा नसतानाही प्रदीर्घ स्वास एका निराळ्याच प्रकाराच्या आनंदाने धुंद होऊन जाणे, प्रचंड स्फूर्ति निर्माण होणे वगैरे गोष्टी आपण न करताच आपोआप होऊ लागतात. याकडे पाहिल्यावर असे वाटते की, शरीरात कोणी सिद्ध योगीच बसून शरीराकडू साधणा करवून घेत आहे. मग निरनिराळे बंध, मुद्रा होतील आसन दृढ होऊन दृष्टी भ्रूमध्यात खेचली जाऊन, मन बाह्य-ज्ञान शून्य होते. अशा तऱ्हेने एक एक श्रेष्ठ अनुभवांचे जणू भांडारच खुले होते. मग आतापर्यंत कधीही न अनुभवलेल्या अवणनीय आनंद व समाधानाच्या स्थितीला साधक हळूहळू प्राप्त होऊ लागतो. शरीरातील प्राणाचा सूक्ष्म प्रवाह जाणवू लागतो, तर क्वचित प्रचंड विद्युत्प्रवाह चालल्या प्रमाणे वाटतो मनात नसतांनाही शरीर उलटेसुलटे होऊन शरीरातील प्रत्येक शीर न शीर पिंजून ही जगदंबा शरीरातील रोगांचा अनेक आसने करवून समूळ नाश करते. कारण जो देह परमेश्वराचे मंदीर बनणार आहे, तो शुद्धच हवा. ही जगदंबा प्रथम शरीतील रोगांचा समूळ नाश करीते. हे सांगताना श्री शंकर म्हणतात.

अभ्यासस्य फलंदेवि कथयाम्यधुना स्फुटम्
आदौ रोगाः प्रणश्यंति पश्चाज्जाडयं शरीरगम् ॥ १८३ ॥ (योगबीज)

“हे देवि पार्वती ! तुला आता थोडक्यात या सिद्धयोग साधनेच्या अभ्यासाचे फल सांगतो. या साधनाभ्यासाने प्रथम सर्व रोग नष्ट होतात. नंतर शरीरातील सर्व जडता नाहीशी होते”.

अशा तऱ्हेने शरीर प्रथम रोगमुक्त होते. मग आसनावर बसताच चित्त एकाग्र होऊन अनेक देवतांचे दर्शन घडेल पुढे येणाऱ्या गोष्टींचे ज्ञान होऊ लागेल वेदवेदांताचे रहस्य सहज समजू लागेल. जिथे तर्क व बुद्धी पोहचत नाही, अशा गूढ तत्वांचे ज्ञान होऊ लागेल. जी साक्षात जगन्माताच आहे, जिच्यापासून सर्व देवदेवतांची उत्पत्तीच आहे; ती आपल्या सुपुत्राला काय बरे देणार नाही ?

आत्माराम यातील मायानिरूपण यामध्ये समर्थ रामदास म्हणतात—

जीव शिव आणि ईश्वर । हाहि मायेचाचि विस्तार ॥
विश्वरूप विश्वंभर । अवघि माया ॥

आत्मा ब्रम्ह आणि स्वरूप । हे ही मायेचेचि रूप ॥
रूप आणि अरूप । सकळ माया ॥

माया सच्चिदानंद । माया आनंदाचा कंद
माया हेचि निजबोध । शब्दरूपे ॥

माया भवसिंधूचे तारू । माया पाववी पैलपारू ॥
मायेविण उद्धारू । प्राणियास नाही ॥

अशी ही आदिमाया जगदंबा कुंडलिनी ज्याची जननी आहे. ती त्याला आपले ऐश्वर्य दाखविणार नाही, असे कधी होईल काय ? मग त्या साधकास ज्ञान प्राप्ती साठी ब्रम्हदेवाकडेही याचना करण्याची इच्छा होणार नाही. कारण जगन्माता त्याची जननी आहे. जशी बालकाची भूक मातेलाच कळते; त्याप्रमाणे साधकाला हव्या असलेल्या गोष्टींही आई स्वतः कौतुकाने पुरविते. अशा तऱ्हेने सद्‌गुरूंजवळ राहून आसन, मुद्रा इत्यादी गोष्टी स्वतंत्र शिकण्याचे कारण नाही. कारण सद्‌गुरूकृपेने प्राप्त झालेले साधन ही शक्ती शिष्याकडून निरनिराळ्या क्रिया आपोआप करवित असल्याने साधकाला कधीही चुकण्याची व त्रास होण्याची भीती राहात नाही. एवढेच नव्हे तर कोणत्याही तऱ्हेचे कष्ट विफल वाटणार नाहीत. उलट आनंदच वाटू लागेल. अशा ह्या कुंडलिनी शक्तिची जागृती होणे, साधकाला निश्चितच आनंददायक, चिंता हरण करणारी, दुःख दूर करणारी व मोक्षाप्रत नेणारी आहे. यामुळे जीवात्मा हा परमात्मा बनेल. प्रभुचा विभु बनेल.

वस्तुतः प्रत्येक जीव हा शिवच आहे. परन्तु तो जीवदशेला प्राप्त झाला आहे. मग या जीवाला तू शिव असल्याचे प्रबोधन कुंडलिनी शक्तिच करू शकते. त्यासाठी कोणत्याही मार्गाने तिची जागृती होणे अत्यावश्यक आहे. शक्ति जागृती सद्‌गुरू निरनिराळ्या प्रकाराने करतात शक्तिजागृती करण हेच सद्‌गुरूंचे कार्य आहे. मंत्राने, स्पर्शाने, दृष्टीने, संकल्पाने अशा निरनिराळ्या प्रकाराने शिष्याला प्रबोधन केले जाते. त्याचा आशय शक्तिजागृती हाच आहे. अनेक गुरूंकडून मंत्र घेऊनही जर शक्तिजागृती होऊन कार्यरत होत नसेल; तर त्याला काय करायचे आहे ! केवळ शक्तिजागृती करणारेच गुरू श्रेष्ठ होत. अगदी छोटीशी संजीवनी मुळी सापडल्यावर, इतर गाडीभर वनस्पति करायच्यात काय ? मंत्र किंवा नाम दिल्यानंतर यमनियमांचे काटेकोर पालन करून गुरूपदिष्ट मार्गाने जाऊन सुद्धा १-२ वर्षातही साधकाला शक्तिजागृत होऊन अनुभव येत नसतील, तर ते सर्व व्यर्थ आहे, असे निश्चित समजावे. मग ब्रम्हरसाची अनुभूति कोठून येणार ? मंत्रदीक्षा, स्पर्शदीक्षा, नामदीक्षा कोणतीही असो; शिष्यावर कृपा करून आदिमाया जगदंबा कुंडलिनी देवीची जागृती करतात. त्यासच शक्तिपात म्हणतात. व असे जे करतात तेच सद्‌गुरू. दीक्षा देणे म्हणजेच ज्ञानाची अनुभूति देणे. ज्या गुरूंजवळ ही अनुभूति आहे, तेच ह्या अनुभूतिचे दुसऱ्याला दान करू शकतात.

ज्याला खरी चिरशांतिची तळमळ असेल; त्याने अशी शक्तिपात दीक्षा कोठे मिळेल याच्या शोधात असले पाहीजे. इतर शेकडोशे साधनांचा उपासनांचा व मार्गाचा त्याग करून जेथे अशी दीक्षा मिळत असेल, तेथे निःसंकोच पदर पसरला पाहीजे. सिद्धमहापुरूषांकडून शक्तिचे संक्रमण होऊन साधकातील कुंडलिनी जागृत होते; अशा दीक्षेस शक्तिपात दीक्षा म्हणतात. यामध्ये स्पर्शद्वारा अथवा दृष्टीद्वाराही शिष्याची शक्ति गुरूंकडून जागृत केली जाते. पण या सर्वात संकल्पाने शिष्याची कुंडलिनी जागृत करणारे महापुरूष अत्यंत अल्प आहेत. त्यामुळे सर्वात संकल्प दीक्षा हीच सर्वश्रेष्ठ समजली जाते. या शक्तिपाताची श्रेष्ठता सांगताना श्रीसमर्थ म्हणतात—

"मुख्य शक्तिपात तो ऐसा । नाही चंचळाचा वळसा ॥
निवांती निवांत कैसा । निर्विकारी ॥

शक्तिपाताच्या योगाने प्रभू रामचंद्राना ब्रम्हर्षि वसिष्ठाकडून ज्ञानप्राप्ती झाली.—

"हे वसिष्ठ न महाभाग ब्रम्हपुत्र महानसि ।
गुरूत्वं शक्तिपातेन तत्क्षणादेवं दर्शितम् ॥
दर्शनात्स्पर्शनाच्छब्दत्कृपया शिष्यदेहके ।
जनयेद्यः समावेशंशांभव सहिदेशिकः ॥

"हे महाभाग ब्रम्हपुत्र वसिष्ठा ! तू फार थोर आहेस वर सांगितल्याप्रमाणे अनुग्रहयुक्त दृष्टी टाकून शक्तिपाताने शिष्याला ब्रम्हरूप करून तू आपले गुरूत्व शिष्योद्धारसामर्थ्य, आताच्या आताच आम्हास दाखविले आहेस. दर्शन, स्पर्श, शब्द किंवा केवळ कृपादृष्टी यांच्या योगाने जो शिष्याच्या देहात शंभूचा सामावेश करतो, व स्वशरीरातून न निघताच शिष्याची कुंडलिनी जागृत करून षट्चक्रांचा भेद करून ब्रम्हरंध्रात राहणाऱ्या पराशिवाशी शक्तिचे ऐक्य घडवून आणून, जीवाचे जीवत्व नाहीसे करून त्याला ब्रम्हत्व प्राप्त करून देणारा शक्तिपात करतो, तोच खरा गुरू होय."

राजर्षि विश्वामित्रा सारख्या श्रेष्ठ महामुनीने शक्तिपात करणाऱ्या ब्रम्हर्षि वसिष्ठ ऋषिची वरील श्लोकात केलेली स्तुती ! यावरून शक्तिपात करणारे सिद्धमहापुरुष किती श्रेष्ठ आहेत, याची महानता लक्षात येते. भगवंतानी अर्जुनाला आलिंगन देऊन म्हणजेच स्पर्शद्वारा शक्तिसंक्रमित करून, अज्ञानाचा नाश केला. त्याचवेळी त्याला सर्व जगत् परमेश्वरस्वरूप कळले. हे शक्तिचे अनन्य साधारण महत्व आहे. परन्तु अशा या शक्तिची जागृती सद्‌गुरूविना विना सायास होऊ शकत नाही. सद्‌गुरूंच्या कृपा-दृष्टीने किंवा केवळ संकल्पाने ही शक्ति जागृत होऊन साधकाला आनंदप्राप्त करून देते.

स्वामी विवेकानंद राजयोगाच्या कुंडलिनी प्रकरणात म्हणतात– "भारत वर्षामध्ये फारच थोडे असे अतिशय श्रेष्ठ योगी आहेत की; जे केवळ संकल्पमात्राने हजारो मैलावर असलेल्या साधकाला शक्तिसंक्रमित करून स्वतःचे व त्याचे स्थान न सोडता, त्याला दिव्य अनुभव देऊ शकतात." सध्या भारतवर्षात हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच संकल्प दिक्षा देणारे म्हणजेच संकल्पाने कुंडलिनीची जागृती करून साक्षात्कार घडविणारे असे श्रेष्ठ पुरूष आहेत. परन्तु यापैकी संसारात राहून संसारी जीवांच्या अडचणी समजून, त्यातून मार्ग काढून देणारे अत्यल्पच आहेत. आणि अशा तऱ्हेने संसारीक नव्हे, तर सर्वांनाच मार्गदर्शन झाले नाही तर ही मूल्यवान गोष्ट भारतीय परंपरेपासून लुप्त होऊ लागेल. या करीता अधिकाधिक लोकांना याच्यापर्यंन्त पोहोचता येऊन चांगल्या सत्वशील लोकांकडून जतन केले जाणे अत्यावश्यक आहे.

"सुदैवाने आम्ही प्रस्थापित केलेल्या श्री सिद्धमहायोग साधना आश्रमाचे पंचप्राण श्रीपूजनीय सिद्धयोगश्वर (घाग) महाराज हे स्वतः शक्तिपाताधिकारी असून त्यानी महाराष्ट्रातील अनेकांना संकल्प दीक्षा देऊन कृतार्थ केले आहे. संसारात राहून त्यातील अडीअडचणींना तोंड देऊन परमेश्वर प्राप्ती यातच खरे पौरूष आहे. अनेकांचे दैव बलवत्तर म्हणूनच अशा सद्‌गुरूंच्या चरणी राहून त्यांची सेवा करण्याचे व त्यांचे मानसपुत्र होण्याचे भाग्य लाभले, व यांच्याच कृपेने साधकांचा अज्ञान अंधःकार नष्ट होऊन त्रिताप दूर करून संसारात राहूनही परमार्थ साधणें शक्य होत आहे. त्यामुळे हे निश्चितच की; आज प्रज्वलीत झालेल्या आश्रमरूपी तेजबीजाचे धर्मसूर्यात शीघ्रतेने रूपांतर होईल.

" शांति : "

श्री. ज्ञानेश्वरी, योगवासिष्ठ आणि
श्री. समर्थ रामदास यांचा आत्माराम यांचे
आधारावरून---

श्री सिद्धमहायोग साधनाश्रम

(रजि. नं. ई ६७९७ मुंबई)

प्रकाशक :- श्री सिद्धमहायोग साधनाश्रम.
११/डी, शं. वि. सोवनी पथ, ज. शं. मार्ग, मुं. ४००००४.

मुद्रक :- आंतर भारती मुद्रणालय, ४२, आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई ४०० ०३१.